# माहीती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत माहीतीसाठी अर्ज

सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. ९०००
दिनांक: ९/०३/२०२१

आवक क्र. १९४
दि. ०८/०३/२०२१

प्रति,
जन माहीती अधिकारी,
~~आस्थापना विभाग,~~ सामान्य प्रशासन विभाग
मिरा भाईदर महानगरपालीका,
भाईदर ४०१ १०१.

**ही आपल्या विभागाकडे नसल्यास ज्या विभागाकडे आहे, त्या विभागाकडे हा अर्ज ६(३) अन्तर्गत ५ दिवसात वर्ग करून मला कळवा. आवश्यकता भासल्यास संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करून, आवश्यक शुल्क भरून प्रती घेईन.**



१ **अर्जदाराचे पूर्ण नांव :** अमोल गणपत रकवी,

२ **अर्जदाराचा पूर्ण पत्ता :** २०३, गार्डन व्ह्यू अपार्टमेंटस्,
ताम तलाव, वसई (प.) ४०१ २०१

३ **हव्या असलेल्या माहीतीचे वैशिष्ठ्य:**

अ **माहीतीचा विषय :** **महानगरपालिकेने काही कोटी खर्च करून स्कॅन करून घेतलेले अभिलेख**

आ **माहीतीचा कालावधी :** ०१.०४.२००८ ते या अर्जाचे उत्तर देण्याच्या तारखे पर्यंत

इ **हव्या असलेल्या माहीतीचा तपशील:**

महानगरपालिकेने काही कोटी खर्च करून आपल्या काही विभाग, प्रभागातील अभिलेख स्कॅन करून घेतल्याचे कळते. महानगरपालिकेने जर असे केलेले असेलच तर किमान जे अभिलेख अशा तरहेने स्कॅन करून घेतले आहेत त्या सर्व अभिलेखात उपलब्ध असलेल्या बाबतीत माहीती अर्ज आल्यास ती माहीती ३० दिवस न थांबता नागरिकांना ३० दिवसा पूर्वीच देणे शक्य असल्याने, हा निर्णय व हे कार्य स्तुत्यच ठरते.

स्कॅन्ड अभिलेखात उपलब्ध माहीती जर माहीती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरच तर महानगरपालिकेकडे माहीती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कित्येक अर्जामार्फत माहीतीची मागणीच होणार नाही. पण त्यासाठी या प्रक्रीयेत नेमके काय झाले व स्कॅन्ड अभिलेखांचा आता कसा व योग्य उपयोग होणे आवश्यकअहे.

**तरी या बाबतीत अभ्यास व कारवाईसाठी आवश्यकअसलेली खालील माहीती मला द्यावी, ही विनंती.**

१ अभिलेख अशा तरहेने स्कॅन्ड करून घेण्या संबंधी महासभेत ठराव पारीत केला झाला असल्यास व मा. आयुक्तांनी त्या बाबत आदेश दिला असल्यास त्याची माहीती.

२ अभिलेख अशा तरहेने स्कॅन्ड करून घेण्या संबंधी निविदा जाहीर करून दिले गेलेले काम, दिलेला मोबदला याची माहीती.

३ अभिलेख अशा तरहेने ज्या, ज्या विभाग व प्रभागांसाठी स्कॅन्ड करून घेतले गेले त्या, त्या सर्व विभाग व प्रभागातील सर्व अभिलेखांची माहीती. कारण हे स्कॅन्ड अभिलेख महानगरपालिकेने आपल्या संकेत स्थळावर वा आपवर त्याची माहीती नागरिकांना मिळू लागली तर महानगरपालिकेचे माहीती अधिकरा खालील बरेचसे काम कमी होईल.

४ **माहीती कशा तरहेने हवी:** मला ९९३०८३८३८४ वर कळवावे मी न्यायची व्यवस्था करीन.

५ **अर्जदार दारीद्र्यरेषेखाली आहे कां?** नाही

ठिकाण: वसई दिनांक: ०८.०३..२०२१

**अर्जदाराची स्वाक्षरी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

संगणक विभाग

जा.क्र.मनपा/संगणक/७२३ /२०२०-२१ दि.१८/०३/२०२१

प्रति,
**मा. नगरसचिव**
**सचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प्र./न.प./मा.अ.पु.
आवक क्र. ...९६ /२०२१.....
दिनांक:- १८ / ३ /२०२१

**विषय :- केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत.**
**महानगरपालिकेने काही कोटी खर्च करुन स्कॅन करुन घेतलेले अभिलेख बाबत.**

संदर्भ: **१) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्री. अमोल गणपत रकवी यांचा दि.०९/०३/२०२१ रोजीचा अर्ज.**
**२) सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. ०८/०३/२०२१ रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत संदर्भ क्र.१ व २ अन्वये श्री.अमोल गणपत रकवी यांचा सोबतचा अर्ज प्राप्त झाला आहे. सदर पत्रातील मुद्दा क्र.३ (अभिलेख अशा तऱ्हेने ज्या विभाग व प्रभागासाठी स्कॅन करून घेतले गेले त्या, सर्व विभाग व प्रभागातील सर्व अभिलेखाची माहिती) माहिती आपल्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत - संदर्भिय माहिती अधिकारी अर्ज

**(राजकुमार एम.घरत)**
**जनमाहिती अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत - श्री.अमोल गणपत रकवी,**
**२०३,गार्डन व्ह्यू अपार्टमेंट्स,**
**ताम तलाव, वसई(प)४०१ २०१**
**मोबाईल नं ९९३०८३८३८४**

F:\Computer 2020-21\MAHITI ADHIKAR\सर्व विभाग- अमोल रकवी.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101

नगरसचिव विभाग

ईमेल - www.nagarsachiv.mbmc@gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 96 /2021 दि. 9 / 4 /2021.

प्रति,

श्री. अमोल गणपत रकवी,

203, गार्डन व्ह्यू अपार्टमेंट्स,

ताम तलाव, वसई (प.) 401 201

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार नियम 2005

महानगरपालकेने काही कोटी खर्च करुन स्कॅन करुन घेतलेले अभिलेखबाबत.

संदर्भ :- 1) जनमाहिती अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर, मि.भा.मनपा यांचेकडील जा.क्र.मनपा/संगणक/ 423/ 2020-21, दि. 16/03/2021 रोजीचे पत्र. (या कार्यालयास प्राप्त दि. 18/03/2021)

2) सोबत :- आपणांकडील दि. 08/03/2021 रोजीचे माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

जनमाहिती अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भित पत्र 01 अन्वये, आपणांकडील संदर्भित पत्र 02 मधील मुद्दा क्र. 3 (अभिलेख अशा तऱ्हेने ज्या विभाग व प्रभागासाठी स्कॅन करुन घेतले गेले त्या सर्व विभाग व प्रभागातील सर्व अभिलेखाची माहिती) ची माहिती आपणांस उपलब्ध करुन देणेसाठी आपणांकडील संदर्भित पत्र 02 च्या पत्राची छायांकित प्रत या कार्यालयाकडे वर्ग केलेली असून, सदर पत्राची प्रत दि. 18/03/2021 रोजी नगरसचिव विभागास प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, नगरसचिव विभागातील मा. महासभा व मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत, विषयपत्रिका, गोषवारे व सार्व. निवडणूक सन 2002, सन 2007 व सन 2012 मधील उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र व सोबतची सर्व शपथपत्र तसेच कागदपत्र संगणक विभागामार्फत नेमणूक केलेल्या ठेकेदारामार्फत स्कॅन करुन घेण्यात आलेली असून, उपरोक्त स्कॅन केलेली कागदपत्र महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर सार्वजनिकरित्या प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

16/04/2021

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter -Amol Rakvi.docx\Letter – Brijesh Sharma